सकाळ

पुणे, रविवार, २६ जून २००५

# अमेरिकेची 'फेडरल फोर्ज' 'भारत फोर्ज'च्या ताब्यात

पुणे, ता. २५ : कल्याणी समूहातील भारत फोर्ज लिमिटेडने अमेरिकेतील फेडरल फोर्ज इन्कॉर्पोरेटेड कंपनी ताब्यात घेतली आहे. भारत फोर्ज अमेरिका इन्कॉर्पोरेटेड या उपकंपनीच्या माध्यमातून ९१ लाख डॉलरचा हा व्यवहार नुकताच पूर्ण करण्यात आला.

फेडरल फोर्ज ही १९६२ मध्ये स्थापन झालेली कंपनी लान्सिंग (मिशिगन) येथे आहे. वाहन उद्योगाला लागणारे कंट्रोल आर्म्स, लिंक्स, स्टिअरिंग नकल, कनेक्टिंग रॉड असे फोर्जिंग केलेले विविध भाग ती उत्पादित करते. या कंपनीची वार्षिक उलाढाल सहा कोटी डॉलर आहे. झेडएफ लेम्फोर्डर, गुडइयर अशा नामवंत कंपन्या तिच्या ग्राहक आहेत.

जागतिक पातळीवर भारत फोर्जच्या विस्तारासाठी हे संपादन महत्त्वपूर्ण ठरणार असून, प्रवासी मोटारगाड्या व हलक्या वजनाच्या ट्रकच्या बाजारपेठेत भक्कम पाय रोवता येईल, अशी प्रतिक्रिया कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बाबा कल्याणी यांनी व्यक्त केली आहे.